# आदर्श माता

आज ८ मार्च २०१८, म्हणजेच आंतरराष्ट्रीय महिलादिन आहे. महिलांनी अनेक क्षेत्रात आपले कर्तृत्व गाजवले आहे, आणि त्या महिलांची माहिती पुस्तकाद्वारे किंवा प्रसारमाध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचते. तथापी असंख्य महिला अल्पशिक्षीत असूनही कर्तृत्ववान व्यक्तींना घडवत असतात. अशाच एका महिलेची ही कथा आहे.

महाराष्ट्राचे आंतरराष्ट्रीय किर्तीचे एक शास्त्रज्ञ, त्यांच्या अल्पशिक्षीत आईने कसे घडवले त्याची गोष्ट मी सांगणार आहे. गोव्यातल्या एका खेड्यात अत्यंत गरीब कुटुंबात त्यांचा जन्म झाला. ते सहा वर्षांचे असतांना त्यांचे पितृछत्र हरपले, त्यामुळे त्यांच्या आईने मुंबईला येण्याचा निर्णय घेतला. मुंबईच्या महापालिकेत तिने नोकरी मिळवण्याचा प्रयत्न केला. तिथल्या अधिकाऱ्याने तिचे शिक्षण किती झाले ते विचारले असता, तिने मी तिसरीपर्यंत शिकल्याचे सांगितले, "इतक्या कमी शिकलेल्यांना आमच्याकडेच काय कुठेही काम मिळणार नाही" असे तिच्याकडे तुच्छतेने बघत सांगितले. त्यामुळे हा अपमान त्या माऊलीच्या जिव्हारी लागला. त्याचवेळी तिने निश्चय केला की, माझ्या मुलाला मी खूप शिकवीन. तिने घरी आल्यावर आपल्या मुलाला सांगितले की, आज माझे शिक्षण फक्त तिसरीपर्यंत झाले आहे म्हणून माझा अपमान झाला आहे, तू मात्र इतका शीक की जगातले सर्वोच्च शिक्षण तुला मिळाले पाहिजे, आणि तुझा कोणीही अपमान करणार नाही. चरीतार्थासाठी तिला रस्त्यावर भाजी विकावी लागत होती. पैश्याची अडचण असल्याने चांगल्या शाळेत घालण्याऐवजी तिने आपल्या मुलाला महपालिकेच्या मराठी शाळेत घातले. अतिशय लहान खोलीत राहत असल्यामुळे घरात रॉकेलच्या एकच दिवा होता

REDMI NOTE 8
AI QUAD CAMERA

मुलाला अभ्यास करण्यासाठी रस्त्यावरच्या दिव्याखाली बसावे लागत होते. पुढे त्याने रेल्वे स्टेशनवर रात्री १२.३० ते ४ वाजेपर्यंत उपनगरी गाड्या बंद असतात म्हणून शांततेत अभ्यास होईल, यासाठी तेथे जाऊ लागला. जो त्याच बुद्धिमान असलेला हा मुलगा म्हणजेच डॉ. रघुनाथ माशेलकर हे आपण ओळखले असेलच.
आईचे त्याच्या अभ्यासाकडे इतके लक्ष असायचे की गणितात त्याला नेहमी १०० मार्कस असायचे. पण एकदा त्याला ९७ मार्क मिळाले, तेव्हा आई त्याला म्हणाली, उरलेले तीन मार्क कुठे गेले, आणि तुला ते का नाही मिळाले? त्याचा शोध घे. त्याच्या आईची ही दृष्टी त्याला आणखी प्रोत्साहन देत होती, की सर्वात उत्तम जे असेल तेच झाले पाहिजे.
रघुनाथ S.S.C च्या परिक्षेत अकरावा आला. त्यावेळी त्याचा सत्कार झाला. आणि बक्षिस म्हणून रु. २०० मिळाले. पुढील सर्व शिक्षण वेगवेगळ्या शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे झाले. बी.एस.सी. पदवीनंतर रघुनाथ आईला म्हणाला होता की मला आता तरी नोकरी करु दे. म्हणजे तुझे कष्ट संपतील. पण आई म्हणाली की आता नोकरी नको कारण तुला आणखी पुढचे शिक्षण जे असेल ते घ्यायचे आहे. एम.एस.सी पास झाल्यावर त्याचा आईनेच कोणाला तरी विचारुन पी.एच.डी. हा शिक्षणाचा पुढचा टप्पा आहे, हे शोधून काढले. तिने रघुनाथला पुढे शिक्षण चालू ठेवण्यास सांगितले. P.H.D मिळाल्यानंतर रघुनाथ माशेलकर पुण्याच्या राष्ट्रीय रसायन प्रयोगशाळेत (NCL) मोठ्या हुद्द्यावर काम करु लागले. पण आई सारखी म्हणायची इतके शिक्षण पुरेसे नाही. पुढे आणखी काय शिकता येईल ते पहा. त्यानंतर डॉ. माशेलकर पुढील (Post Doctorat Research) उच्च अभ्यासासाठी १९६९ मध्ये इंग्लंडला गेले. त्यांना त्यांच्या

REDMI NOTE 8
AI QUAD CAMERA

संशोधकार्यामुळे जगातील अनेक विद्यापिठांनी मानद डॉक्टरेट दिली. माशेलकरांचे एक महत्वाचे राष्ट्रीय कार्य म्हणजे हळद, आणि बासमती तांदूळ यासाठी विदेशातील व्यक्तींनी घेतलेले पेटंट रद्द करवून घेण्यासाठी यशस्वी लढा दिला. १९९१ मध्ये डॉ. माशेलकरांना पद्मश्री मिळाली तेव्हा आईला आनंद झाला. आणि म्हणाली आता याचेक्षा आणखी काय असते ते मिळाले पाहिजे. माशेलकरांना २००० मध्ये पद्मभूषण आणि २००५ मध्ये त्यांना पंचाविसावी डॉक्टरेट मिळाली. तेव्हा कुठे आई म्हणाली आता माझे समाधान झाले.

सप्टेंबर २००६ मध्ये उल्लेखनीय संशोधन कार्यासाठी अत्यंत मानाचा डॉ. शांतीस्वरूप भटनागर ~~संशोधन कार्यासाठी~~ हा पुरस्कार डॉ. माशेलकरांना मिळाला. त्यावेळी आईला अतिशय आनंद झाला. १७ नोव्हेंबर २००६ मध्ये त्यांच्या आईचे निधन झाले. तसेच २०१४ मध्ये भारत सरकारचा पद्मविभूषण पुरस्कार मिळाला तोपर्यंत त्यांना ३८ वी मानद पी.एच.डी. सुद्धा मिळाली तेव्हा आपल्या आईची माशेलकरांना तीव्रतेने आठवण झाली की हा आपला बहुमान बघायला आपली आई हयात नाही.

त्यांची आई त्यांना एकदा म्हणाली होती, की, रमेश गरीबांसाठी आणि महिलांसाठी काहीतरी चांगले कर. त्यांना लहानपणापासून लाडाने आई रमेश म्हणत असे. आईच्या इच्छेप्रमाणे त्यांना अंजनी फौंडेशनची स्थापना केली. या फौंडेशनकडून दरवर्षी ग्रामीण भागात आपल्या कल्पकतेने, सामान्य जनतेसाठी उपयुक्त असे छोटे/मोठे यंत्र तयार करणाऱ्या संशोधकाला १ लाख रु. देण्यात येतात.
डॉ. माशेलकरांविषयी सांगण्यासारखे इतके आहे की त्यासाठी कमीत कमी २ तास लागतील. पण आज महिलादिन असल्यामुळे त्यांना घडविणाऱ्या त्यांच्या आईचे म्हणजेच एका अल्पशिक्षीत महिलेचे कर्तृत्व मला तुम्हाला ~~सांगायचे~~ सांगायचे होते. डॉ. माशेलकर एकदा एका कार्यक्रमात म्हणाले, माझे

REDMI NOTE 8
AI QUAD CAMERA

शाळेत
शिक्षण मुंबई महापालिकेच्या मराठी माध्यमाच्या अडचण
झाले. मातृभाषेतून शिक्षण झाल्यामुळे मला कोणतीही माध्यमातून
आली नाही. ज्याची अशी समजूत आहे की इंग्रजी आहे.
शिक्षण घेणे, हे सर्वप्रकारच्या प्रगती साठी आवश्यक
हे अशा विचारांच्या पालकांना मला सांगायचे आहे -



डॉ. अरुण जोशी

संपर्क ~~---~~ 9869267520

REDMI NOTE 8
AI QUAD CAMERA

